25 OCT 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीची रणधुमाळी सुरु

## विद्यापीठ विकास आघाडीच्या विरोधात सुटाचे कार्यकर्ते सक्रीय, सर्वच संघटनांच्या बैठकांना जोर, विद्यार्थी संघटना पक्षनेतृत्त्वाच्या निर्णयावर ठाम

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी १७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून ३१ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत आहे. त्यामुळे या निवडणुकीची तयारी करण्यासाठी संघटनांकडे अवघे २२ दिवस शिल्लक राहिले असल्यामुळे विद्यापीठ विकास आघाडी, सुटा संघटना आणि इतर विद्यार्थी संघटनांच्या हालचालींना वेग आला आहे. या सर्वच संघटनांनी आपआपले उमेदवार निश्चित केले आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यामुळे सर्वच संघटनांच्या बैठकांनी जोर धरला असून या बैठकांमधील अंतिम निर्णयानंतरच उमेदवार यादी जाहीर करण्याचा निर्णय संघटनांनी घेतला आहे.

सिनेटची निवडणूक जाहीर झाल्यापासून शिक्षक, प्राचार्य, कर्मचारी, विद्यार्थी संघटनांच्या बैठका होत आहेत. उमेदवार अर्ज विक्री सुरू झाल्यानंतर मात्र विविध संघटनांच्या हालचालींना वेग आल्याचे चित्र आहे. काही संघटनांच्या नेत्यांनी इच्छुकांच्या मुलाखती देखील घेतल्या आहेत. असे असले तरी पक्षाचे नेतृत्त्व निवडणुकीसंदर्भात जो निर्णय घेतील तो अंतिम असल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांनी दिली. त्यामुळे



विद्यापीठ विकास आघाडीच्या विरोधात सुटासह शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी संघटनेच्या बॅनरखाली काही विद्यार्थी संघटना निवडणूक रिंगणात उतरणार आहे. या विद्यार्थी संघटनेतील कार्यकर्त्यांच्या संपर्कात बडे नेते असल्याचे बोलले जाते.

विद्यापीठ परिक्षेत्रातील शिक्षक संघटना, संस्थाचालक, प्राचार्य असोसिएशन, सेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, राष्ट्रवादी युवा संघटना, एनएसयुआय काँग्रेस, भाजप युवा मोर्चासह इतर काही संघटनांची मिळून 'विद्यापीठ विकास आघाडी' आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अनिल पाटील आदी दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ निवडणुक होणार आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये विद्यापीठ विकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत कोणाला उमेदवारी द्यायची यावर शिक्कामोर्तब झाला. अभ्यासमंडळाच्या ६० विषयांसाठी प्रत्येकी ३ उमेदवारांचे अर्ज भरून घेण्यात आले. संस्थाचालक व प्राचार्य संघटनांच्या दोन बैठका झाल्या आहेत. दोन दिवसात एक बैठक घेऊन अंतिम उमेदवार यादी जाहीर करण्यात येणार आहे. पुढच्या आठवड्यात बैठक घेऊन अंतिम यादी जाहीर करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. या बैठकीला रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेसह अन्य शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सुटा संघटना पहिल्या टप्प्यात विद्या परिषद, अधिसभा, विविध अभ्यास मंडळांच्या जागा लढवणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच सुटा संघटना पदवीधर निवडणूक लढवणार नसल्याची चिन्हे आहेत. त्यामुळे ही संघटना पदवीधरसाठी कोणाला पाठिंबा देणार याकडेही विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या एका बैठकीत सुटाने उमेदवारांची अंतिम यादी निश्चित केली. तसेच महत्वाच्या विषयाचे अर्जदेखील भरले आहेत. मात्र संस्थाचालकांच्या दबावाखाली 'सुटा'तील किती प्राध्यापक विद्यापीठ विकास आघाडीच्या गळाला लागणार याकडे सुटाने लक्ष केंद्रीत केले आहे. कारण त्यानंतरच एकूण निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापरिषदेसाठी पात्रता निश्चित केली आहे. कायद्यानुसार पात्र उमेदवारांची संख्या कमी असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. त्यामुळे विद्यापरिषदेसाठी किती अर्ज येतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विद्यापरिषदेसाठी पात्र उमेदवार रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत जास्त असल्याने या दोन्ही शिक्षण संस्थेवरच विद्यापीठ विकास आघाडीचा अंतिम निर्णय अवलंबून असल्याचेही बोलले जाते. या दोन संस्थेतील कित्येक प्राध्यापक विद्यापीठ विकास आघाडीच्या गळाला लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुटा संघटनेत सध्या अस्वस्थतेचे वातावरण आहे. शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी संघटना, युवा सेना, मनसे, युएसएए, निर्मिती विचारमंच आदी विद्यार्थी संघटनांची बुधवारी सायंकाळी बैठक आहे. या बैठकीनंतर पदवीधरच्या १० जागांसाठीची अंतिम यादी जाहीर होणार आहे.

### ४५ अधिकार मंडळांपैकी ३२ अधिकार मंडळासाठी मतदान होणार

शिवाजी विद्यापीठाच्या निवडणूका ४५ अधिकार मंडळासाठी जाहीर झाल्या आहेत. यापैकी १२ अधिकार मंडळासाठी एकाही उमेदवाराचा अर्ज न आल्याने ही निवडणूक फक्त ३२ अधिकार मंडळासाठी होणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली.

### विद्यापीठाची जय्यत तयारी

विद्यापीठ निवडणुकांचे अर्ज भरून घेण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. याचबरोबर निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, निवडणुक अधिकारी निश्चित करणे, मतदानपेट्यांची व्यवस्था करणे, आदी कामांसाठी विविध समित्यांची स्थापना केली आहे. विद्यापीठ प्रशासनाच्या नियोजनानुसार या समित्या आपआपल्या कामाला लागल्या आहेत.

### दुसऱ्या दिवसापर्यंत ४४० उमेदवार अर्ज विक्री

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळासाठी सोमवारपासून उमेदवार अर्ज विक्रीला प्रारंभ झाला आहे. मंगळवारपर्यंत ४४० अर्जांची विक्री झाली आहे. मात्र गेल्या दोन दिवसात मात्र एकही उमेदवारी अर्ज विद्यापीठ प्रशासनाकडे जमा झालेला नाही, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 OCT 2017
पुण्यनगरी

# दुसऱ्या दिवशी २९० अर्जांची विक्री

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या दिवशी मंगळवारी २९० अर्जांची विक्री झाली. दोन दिवसांत एकूण ४४० अर्जांची विक्री झाली आहे. अर्ज विक्री आणि स्वीकृतीसाठी अजून सात दिवस बाकी आहेत. मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होत असल्याने ही निवडणूक चुरशीची होणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

विद्यापीठातील ४५ अभ्यास मंडळांसाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड होणार आहे; मात्र या अभ्यास मंडळांपैकी १२ विषयांच्या अभ्यास मंडळांसाठी एकाही मतदाराची नोंदणी झालेली नाही. त्यामुळे या विषयांच्या अभ्यास मंडळांची निवडणूक होणार नाही. यामध्ये फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण अभियांत्रिकी, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर इंजिनिअरिंग, प्राकृत भाषा, मॉडर्न फॉरेन लँग्वेजेस अदर दॅन इंग्लिश, तत्त्वज्ञान, एनसीसी अँड एनएसएस, लायब्ररी अँड इन्फर्मेशन सायन्स, सोशल वर्क अँड अलाईड सब्जेक्टस्, व्होकेशनल एज्युकेशन, परफॉर्मिंग अँड फाईन आर्टस् या विषयांच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ही अभ्यास मंडळे वगळता ३३ अभ्यास मंडळांसाठी निवडणूक होणार आहे.



सिनेट निवडणूक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2017

पुढारी

# अधिसभा : ४४० अर्जांची विक्री

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी दोन दिवसांत ४४० अर्जांची विक्री झाली. पहिल्या दिवशी १५० अर्जांची विक्री झाली होती. अधिसभा निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या यामुळे वाढणार असल्याचे चित्र आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत असणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सोमवारपासून अर्ज विक्रीला सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठाच्या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार घेण्यात येणार आहेत. या नव्या कायद्यातील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी आदी निवडले जाणार आहेत. विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक प्रतिनिधी, प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यात येणार आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'सिनेट'साठी ४४० अर्जांची विक्री

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी अर्ज विक्रीच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी ४४० अर्जांची विक्री झाली. सोमवार (ता.२३) पासून अर्ज विक्रीला सुरुवात झाली होती. पहिल्या दिवशी १५० अर्जांची विक्री झाली होती. अद्याप कोणीही अर्ज दाखल केलेला नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर असून, ४ नोव्हेंबरपर्यंत माघारीची मुदत आहे.

दरम्यान शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने निवडणुकीची सूचना जाहीर केली आहे. यामध्ये अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यास मंडळांचा समावेश आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निडणुकीद्वारे निवडण्यात येणार आहेत. यातील राखीव जागांच्या आरक्षणाबाबतचा तपशील निवडणूक सूचनेमध्ये देण्यात आला आहे.

विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक निवडून द्यावयाचे आहेत. त्यापैकी प्रत्येकी एक शिक्षक राखीव प्रवर्गातून निवडून देणे आवश्यक आहे. आठ शिक्षकांमध्ये एका महिला शिक्षकाचा समावेश असेल. विद्यापीठातील एकूण चार विद्या शाखांतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2017
पुढारी

# बारा अभ्यासमंडळे निवडणुकीतून बाहेर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या निवडणुकीत एकासुद्धा मतदाराची नोंदणी झाली नसल्याने विविध १२ अभ्यासमंडळे बाहेर पडली आहेत. या अधिसभा निवडणुकीअंतर्गत विद्यापीठातील एकूण चार विद्याशाखांतर्गत ४५ अभ्यासमंडळे आहेत. त्यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यासाठी निवडणूक होणार आहे. मात्र, या अभ्यासमंडळांपैकी बारा विषयांच्या अभ्यासमंडळांसाठी एकाही मतदाराची नोंदणी झालेली नाही. त्यामुळे या विषयांच्या अभ्यासमंडळांची निवडणूक होणार नाही.


शिवाजी विद्यापीठातून

: पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण अभियांत्रिकी, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मॉडर्न फॉरेन लँग्वेजेस अदर दॅन इंग्लिश, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, तत्त्वज्ञान, लायब्ररी अँड इन्फर्मेशन सायन्स, सोशल वर्क अँड अलाईड सब्जेक्टस्, व्होकेशनल एज्युकेशन, आर्किटेक्चर इंजिनिअरिंग, प्राकृत भाषा, परफॉर्मिंग अँड फाईन आर्टस्, एनसीसी अँड एनएसएस या विषयांच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

25 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बारा अभ्यास मंडळांची निवडणूकच नाही

## मतदार नसल्याचा परिणाम; शिवाजी विद्यापीठात दुसऱ्या दिवशी २९० अर्जांची विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : एकाही मतदाराची नोंदणी झाली नसल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीच्या रिंगणातून विविध १२ अभ्यासमंडळे बाहेर पडली आहेत. या निवडणुकीच्या अर्जविक्री आणि स्वीकृतीच्या प्रक्रियेतील दुसऱ्या दिवशी मंगळवारी २९० अर्जांची विक्री झाली.

### दुप्पट अर्ज

यावर्षीच्या अधिसभा निवडणुकीसाठी दोन दिवसांत एकूण ४४० अर्जांची विक्री झाली आहे. मागील निवडणुकीमध्ये ३५० अर्जांची विक्री झाली होती. या वर्षीसाठी अर्जविक्री आणि स्वीकृतीसाठी अजून सात दिवसांची मुदत आहे.

या अधिसभा निवडणुकीअंतर्गत विद्यापीठातील एकूण चार विद्या शाखाअंतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. त्यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभाग प्रमुखांमधून तीन विभाग प्रमुखांची निवड करण्यासाठी निवडणूक होणार आहे. मात्र, या अभ्यास मंडळांपैकी १२ विषयांच्या अभ्यास मंडळांसाठी एकाही मतदाराची नोंदणी झालेली नाही. त्यामुळे या विषयांच्या अभ्यास मंडळांची निवडणूक होणार नाही.

यामध्ये फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण अभियांत्रिकी, टेक्स्टाईल इंजिनिअरिग अँड टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर इंजिनिअरिंग, प्राकृत भाषा, मॉडर्न फॉरिन लँग्वेजेस अदर दॅन इंग्लिश, तत्त्वज्ञान, एनसीसी अँड एनएसएस, लायब्ररी अँड इन्फर्मेशन सायन्स, सोशल वर्क अँड अलाइड सब्जेक्टस, व्होकेशनल एज्युकेशन, परफॉर्मिंग अँड फाईन आर्टस या विषयांच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

या अभ्यासक्रमांसाठी अनेक ठिकाणी शिक्षकांची नियुक्ती झालेली नाही. त्याचा परिणाम हा मतदार नोंदणी न होण्यावर झाला आहे.